**जातके :** गौतम बुद्धाच्या पूर्वजन्मासंबंधीच्या कथा 'जातके' किंवा जातककथा म्हणून ओळखल्या जातातजातक . ह्या शब्दाचा अर्थ 'जन्मासंबंधी' असा आहेबुद्धत्व प्राप्त होण्यापुर्वी गौतम बुद्धाला अनेक योनींत जन्म घ्यावे . दान .लागले, शील, नैष्कर्म्य, प्रज्ञा, वीर्य, क्षांती, सत्य, अधिष्ठान, मैत्री व अपेक्षा ह्या दहा पारमितांचा उत्तरोत्तर विकास त्याने ह्या जन्मात करून घेतला आणि ह्या विकासाची परमोच्च अवस्था (पारंगतता) गाठल्यानंतर 'गौतम बुद्ध' म्हणून तो अवतरला, अशा श्रद्धेतून ह्या कथा आकारलेल्या आहेतह्या . जातकाकथांतून बुद्ध हा 'बोधिसत्त' (बोधिसत्वह्या नावाने कथानायक (, कथेतील दुय्यम पात्र वा कतेतील घटनांचा एक प्रेक्षक म्हणून वावरलेला आहेबुद्धत्वाच्या प्राप्तीसाठी प्रयत्नशील असा प्राणी ., अशा अर्थाने बोधिसत्व हा शब्द वापरला गेला आहेपशू ., पक्षी, जलचर आदी विविध योनींत बोधिसत्वाने जन्म घेतला, असे ह्या कथांतून दाखविलेले असले, तरी तो मादीरूपात मात्र आढळत नाही.

संदर्भ :

http://www.marathivishwakosh.in/index.php?option=com_content&view=article&id=11287